**देहुरोड पोलीस स्टेशन**
**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय**
**पत्ता:-जुना पुणे-मुंबई हायवे, सेंट्रलचौक, देहुरोड, पुणे.**
**फोन नं.०२०-२७६७१२८८**
**ई-मेल आयडी-psdehuroad.pcpc-mh@gov.in**

**प्रेसनोट दिनांक- ०५/१०/२०२४**

# † रुमचा पत्रा वाजविल्याच्या कारणावरून भांडण करून खुन करणाऱ्या दोन आरोपींना देहूरोड पोलीसांकडुन अटक †

दिनांक ०२/११/२०२४ रोजी फिर्यादी नामे प्रमोद मोहित यादव, रा. विठ्ठलवाडी, तळवडे हॉस्पीटलजवळ, पुणे यांनी फिर्याद दिली की, त्यांचा भाऊ नामे अमोदकुमार मोहित यादव हा त्याचे मित्रांसोबत असताना जयप्रकाश सदय व भोगींदर सदय दोघे रा. विठ्ठलवाडी, तळवडे हॉस्पीटलजवळ, पुणे यांनी त्यांचे घराचा पत्रा वाजविल्याने झालेल्या भांडणाचा राग मनात धरून त्यांनी त्यांचे भावास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने लाकडी दांडक्याने डोक्यात व पाठीत मारहाण करून जखमी केले असुन त्यांचा भाऊ अमोदकुमार मोहित यादव याचा औषधोपचार दरम्यान मृत्यु झाला अशी फिर्याद दिल्याने त्यांचे तक्रारीवरून देहूरोड पो.स्टे.गुरजि नं.५०६/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१),११८(१),१०९,३५१(३),३(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर खुनाचा गंभीर गुन्हा दाखल होताच वरिष्ठांच्या आदेशाने देहूरोड पोलीस ठाणे येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांची दोन पथके तयार करून त्यांना आरोपींचा शोध घेणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. आरोपी भोगेंद्रकुमार जोखन सदाय वय २३ वर्षे, रा. अपोल पॅकेजिंग सनसवाडी, शिक्रापुर पुणे मुळ रा. गंगापुर ता. नखरूड जि. मधुबनी राज्य बिहार हा गुन्हा करून शिक्रापुर येथे पळुन गेल्याची माहिती पोलीस हवालदार किरण खेडकर यांना मिळाल्याने देहूरोड पोलीस ठाणे येथील तपास पथकातील अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी वेशांतर करून सदर आरोपीस शिक्रापुर येथुन दोन तासाच्या आत ताब्यात घेवुन देहूरोड पोलीस स्टेशन येथे आणुन तपास केला असता त्याने दाखल गुन्हा त्याचा साथीदार नामे जयप्रकाश रामकिसन सदाय, वय १९ वर्षे, रा. हांडेवाडी, कात्रज, पुणे मुळ रा. गंगापुर ता. नखरूड जि. मधुबनी राज्य बिहार याचे मदतीने केल्याची कबुल दिल्याने त्यास दाखल गुन्ह्यात अटक केले.

त्यानंतर अन्य पाहिजे आरोपी नामे जयप्रकाश सदाय याचे ठाव ठिकाणाबाबत गोपणीयरित्या माहिती प्राप्त केली असता तो त्याचे मुळ गावी मधुबणी, बिहार येथे पळुन जात असल्याबाबत बातमी पोलीस अंमलदार केतन कानगुडे यांना मिळाल्याने देहूरोड पोलीस स्टेशन कडील तपास पथक त्याचे मागावर असताना तो खेड शिवापुर येथुन कुर्ला, मुंबई येथे जावुन कुर्ला येथुन ट्रेन पकडुन त्याचे मुळ गावी मधुबनी, बिहार येथे ट्रेनने पळुन जात असताना त्याला भुसावळ रेल्वे जंक्शन येथुन शिताफीने ताब्यात घेवुन सदर गुन्ह्यात अटक केली आहे. नमुद गुन्ह्यात आरोपींची दिनांक ०८/११/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी असुन देहूरोड पोलीस अधिक तपास करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा.पोलीस सह आयुक्त श्री. शशीकांत महावरकर सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ–२ श्री. विशाल गायकवाड सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. सुनिल कुराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय वाघमारे, श्री. विजयकुमार वाकसे, पोनि गुन्हे यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सोहन धोत्रे, पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पोलीस अंमलदार किरण खेडकर, बाळासाहेब विधाते, प्रविण माने, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, युवराज माने, शुभम बावनकर, खंडु विरणक, मंगेश लोखंडे यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(विशाल गायकवाड)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**परिमंडळ-२ ,पिंपरी-चिंचवड.**